संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# राष्ट्रीय पक्ष आणि दक्षिणेतली राज्ये

लोकसभा निवडणुकीची धामधुम संपत असतानाच विजयाबरोबरच सर्वच राजकीय पक्षांनी आत्मपरीक्षणही करण्याची गरज आहे. अगदी ३०० पेक्षा जास्त जागा जिंकून सत्तेवर आलेल्या भारतीय जनता पार्टीनेसुध्दा सिंहावलोकन केले पाहिजे. तर महागठबंधन स्थापन करून विजयाचे अवसान आणणाऱ्या काँग्रेससकट इतर राजकीय पक्षांनीसुध्दा पराभवाची मिमांसा केली पाहिजे. भारतीय राजकारणाने काही महत्त्वाचे निकष किंवा टप्पे या निवडणुकीच्या निमित्ताने नक्की केलेले दिसून येतात. वस्तुस्थितीचा परखडपणे अभ्यास केला तर या निकषांवर कोण किती यशस्वी ठरले याचा लेखाजोखा त्या त्या राजकीय पक्षांना घेता येऊ शकतो. ज्याप्रमाणे २१ पक्ष एकत्र येतात परंतु सरासरी प्रत्येकाच्या वाट्याला अकरा जागाही येऊ शकत नाहीत. त्याचप्रमाणे तीनशे जागा जिंकूनही सत्ताधारी भारतीय जनता पार्टीला दक्षिण भारतात अजूनही स्थान मिळू शकत नाही. विशिष्ट राज्यांमध्ये विशिष्ट प्रादेशिक पक्षांचा प्रभाव वर्षानुवर्षे कायम राहिला आहे. त्यात दक्षिणेतले प्रादेशिक पक्ष हे विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये सातत्याने यशस्वी होताना दिसतात. तर उत्तर किंवा मध्य भारतातले प्रादेशिक पक्ष त्या तुलनेत यशस्वी होताना दिसत नाहीत. सत्ताधारी भारतीय जनता पार्टीने विजयाचा महाजल्लोष चालवला असतानाच संपूर्ण देशाने आपल्याला अजून स्वीकारलेले नाही हा पैलूदेखील लक्षात घेतला पाहिजे. तामिळनाडू , केरळ, आंध्र, ओरिसा, या राज्यांमध्ये भारतीय जनता पार्टीला कोणतेही विशेष स्थान निर्माण करता आलेले नाही. आंध्र, ओरिसा, केरळ, या ठिकाणी भाजपाला स्वतःचे खातेही उघडता आलेले नाही. म्हणजे देशाचे दक्षिणद्वार अजूनही भाजपासाठी उघडले गेले नाही. ते भाजपासाठी अजून बरेच मैल दूर आहे. असा निष्कर्ष त्यात काढता येतो. त्यावेळी आपण नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाची चर्चा करतो. आणि लोकसभा निवडणूक ही प्रामुख्याने केंद्र सरकारच्या कामगिरीचा मापदंड असतो. त्या निवडणुकीतही भाजपाला दक्षिणेतल्या राज्यांनी अजिबात किंमत देऊ नये. हे एक आश्चर्य ठरते. भाजपाचे नेतृत्व जनतेला मान्य आहे असे मानले तर त्याचा दक्षिणेत प्रभाव का दिसू नये. हाही एक चर्चेचा मोठा मुद्दा ठरतो. हे एक ध्रुवीकरण पाहायला मिळते.

### दक्षिण भारताचे वेगळेपण

वारंवार तेच प्रादेशिक पक्ष आणि नेत्यांचा वर्षानुवर्षे प्रभाव हाही एक वेगळा प्रकार दक्षिणेतल्या राज्यांबाबत दिसून येतो. राजकारणाचे दक्षिणध्रुव आणि उत्तरध्रुव असे त्याचे वर्णन करता येऊ शकते. राष्ट्रीय पक्षांनी तिथेही प्रचार केला. तरी त्याचा त्या मतदारांवर परिणाम होताना दिसत नाही याचा सरळ अर्थ असा होतो की स्वतःला राष्ट्रीय पक्ष म्हणवून घेणाऱ्या काँग्रेस आणि भाजपाची वैचारिक मांडणी तिथल्या मतदारांपर्यंत यशस्वीपणे पोहचतच नाही. म्हणूनच भाजपाने विजयोत्सव साजरा करीत असताना आणि काँग्रेसने पराभवाचे विश्लेषण करीत असताना दक्षिण भारतातल्या त्यांच्या अपयशाबद्दल चिंतन केले पाहिजे. कारण एकाचवेळी जवळपास दक्षिणेतली पाच ते सहा राज्ये या राष्ट्रीय पक्षांना नाकारतात हा अतिशय गंभीर मुद्दा ठरतो. त्यावेळेला संपूर्ण देशासाठी राबवल्या जाणाऱ्या लोकसभा निवडणूक प्रक्रियेचा विचार केला जातो किंवा या पाच राज्यांमध्ये आपले स्थान निर्माण करता येऊ नये. म्हणजेच त्यांचा राष्ट्रीय पक्ष म्हणून गौरवून घेण्यालाच गालबोट लागते. या दक्षिणेतल्या राज्यात एकेकाळी काँग्रेसने प्रादेशिक पक्षांबरोबर सत्ता उपभोगली. या काँग्रेसलादेखील आता देशाच्या दक्षिण भागातून हद्दपार व्हावे लागले आहे. तामिळनाडू , द्रविड मुन्नेत्र कळघम या पक्षाला मिळालेले घवघवित यश किंवा सलग पाचव्यांदा ओरिसामध्ये बिजू जनता दलाच्या नवीन पटनायक यांनी एकहाती सत्ता आपल्याकडे ठेवावी हा नक्कीच चमत्कार म्हणावा लागतो. मध्य भारत, उत्तर भारत, किंवा पश्चिम भारताच्या अनेक भागात नरेंद्र मोदी यांनी जाहीर सभांचा तडाखा लावला होता. अनेक प्रकारच्या माध्यमांमधून मोदी हे मते खेचून आणणारे मसिहा असल्याचे चित्र निर्माण केले गेले होते. परंतु त्यांचा हा प्रभाव दक्षिण भारतामध्ये पाहायला मिळाला नाही. केरळमध्ये परंपरेने प्रादेशिक पक्षांनी आपले महत्त्व कायम ठेवल्याचे दिसून येते.

### विचित्र समिकरण

गेल्या तीन निवडणुकांपासून दक्षिण भारतात म्हणजेच ओडिसा, केरळ, आंध्र प्रदेश तेलंगणा, तामिळनाडू या राज्यांमध्ये आलटून पालटून स्थानिक प्रादेशिक पक्षच विजयी होताना दिसतात. लोकशाही किंवा एकूण राष्ट्रीय राजकारणाचा आयाम लक्षात घेतला तर भाजपा आणि काँग्रेससाठी दक्षिणेतील राज्ये फार मोठे आव्हान ठरली आहे. या दोन्ही राष्ट्रीय पक्षांना तिथल्या जनतेने दादही दिलेली नाही. याचे दोन अर्थ होतात. एक म्हणजे राष्ट्रीय स्तरावरचे पक्ष तिथल्या मतदारांवर आपला प्रभाव निर्माण करू शकत नाहीत. किंवा त्याठिकाणचे राजकारण हे व्यापक राष्ट्रीय आयाम घेण्यासाठी परिपूर्ण नाहीत. तामिळनाडूत तर द्रमुक आणि अण्णा द्रमुक हे दोनच पक्ष विजयाची आलटून पालटून वाटणी करून घेतात. आंध्रमध्येसुध्दा तेलगू देसम पार्टी आपले महत्त्व टिकवून होती यावेळी वायएसएसआर यांच्या पक्षाने विधानसभा आणि लोकसभा या दोन्ही निवडणुकीत तेलगू देसमचा सूपडा साफ केला. भाजपाला तर यावेळेला तिथे खातेही उघडता आलेले नाही. ओरिसामध्ये बिजू जनता दलाचा एक खासदार भाजपात दाखल झाला होता. पण त्याचा कोणताही प्रभाव तिथल्या राजकारणावर पडला नाही. या सगळ्या मुद्दांचा एकत्रितपणे विचार केला तर राजकारणाचे हे एक चित्र चिंताजनक ठरते. काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत किंवा कच्छपासून कलकत्त्यापर्यंत भारतीय जनता पार्टीने आपला प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न चालवला आहे यावेळी पश्चिम बंगालमध्ये पक्षाला चांगले यश मिळाले. किंबहुना देशाच्या पूर्व भागामध्ये भाजपाचे अस्तित्व निर्माण झालेले दिसून येते. परंतु दक्षिण स्वारी मात्र परिपूर्ण होऊ शकलेली नाही.